जा.क.जिपऔ / शिक्षण / प्रावि--3 / 2001--2002 /
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक :-- 14/02/2002

प्रति,
मा.शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग औरंगाबाद

विषय :-- शाळा स्थलांतरास परवानगी मिळणे बाबत.
राष्ट्रकूट प्राथमिक शाळा एन--8,सिडको,औरंगाबाद

संदर्भ :-- 1) मा.श्री.ज.भि.पवार, प्रभारी कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र --व्हीएलएस--1001 / (552 / 2001) / प्राशि--3 / दिनांक-- 27--8--2001
2) शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांचा अहवाल

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राच्या अनूषगाने राष्ट्रकूट प्राथमिक शाळा, एन--8,सिडको, औरंगाबाद हि शाळा एन--8, सिडको औरंगाबाद येथून जाधववाडी, औरंगाबाद येथे स्थलांतर करणे बाबतचा प्रस्ताव या सोबत योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे.

कृपया स्विकार व्हावा, हि विनंती.

आपला विश्वासू

स्वा/-
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद औरंगाबाद

प्रतिलिपी,
1) मा.श्री.ज.भि.पवार, , प्रभारी कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई--32 यांना माहितीस्तव.

2) मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पूणे यांना माहितीस्तव.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद औरंगाबाद

## शाळा स्थलांतराबाबतचा चौकशी अहवाल

## राष्ट्रकूट प्राथमिक विद्यालय, सिडको,

## एन-८, औरंगाबाद.

ह संदर्भ :-

.........

| | | |
|---|---|---|
| १]शाळेस शासनाची मान्यता परवानगी आहे काय ? असल्यास आदेशाचा दिनांक व क्रमांक द्यावा. | :- | क्र.व्ही.एल.एस. १०९६ [९२] प्राशि-२ शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तारभवन, मुंबई, दिनांक ३१ मार्च १९९७. |
| २]सदर शाळा अनुदानपात्र आहे काय ? | :- | |
| ३]शाळा स्थलांतर करण्याबाबतचे कारण काय ? संस्थेने शाळा प्रस्तावीत ठिकाणी स्थलांतरीत केली आहे काय ? असल्यास केंव्हापासुन. | :- | १]सिडको एन-८ परिसरात जागेची अतिशय टंचाई असून शाळेकरीता भूखंड मिळत नाही. सध्या शाळा भाडयाच्या इमारतीत भरते.<br><br>औरंगाबाद सिडको परिसरात मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये अतिक्रमण हटाव मोहिम सुरु असल्यामुळे रहिवासी यांना राहण्याकरीता घरे मिळत नाही, त्यामुळे शाळेकरीता इमारत भाडयाची असून दुबार पध्दतीने शाळा भरते.<br><br>याउलट प्रस्तावीत जाधववाडी परिसर सिडकोला लागूनच असून येथे संस्थेने ९९ वर्षाच्या कराराने जागा घेतली असून नियोजीत इमारत तयार आहे. सोबत नकाशा /फोटो इमारतीचा जोडलेला आहे.<br><br>सध्या शाळा प्रस्तावीत सिडको ठिकाणी स्थलांतरीत झालेली नसून जून-२००२ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी मिळाल्यास प्रशस्त इमारतीत शाळा चालू शकते. |
| ४] मुळ ठिकाण व स्थलांतराचे ठिकाण यामधील अंतर. | :- | सिडको, एन-८ ते जाधववाडी, नविन वसाहत हे अंतर फक्त दिड कि.मी. आहे. |
| ५]स्थलांतराचे नियोजित ठिकाणी शाळेसाठी पुरेसी जागा, खेळाचे मैदान, फर्निचर, व इतर शैक्षणिक व भौतीक सुविधांची पुर्तता केली आहेकाय ? | :- | होय.<br>स्थलांतराचे ठिकाणी भव्य अशी इमारत उभी करण्यात आली असुन, तेथे अद्यावत फर्निचर, भव्य क्रिडांगण व इतर शैक्षणिक व भौतीक सुविधा पुरविणेत येतील. |

९] शाळा स्थलांतरीत झाल्यास मुळ ठिकाणच्या सदरहू शाळेतील विद्यार्थी यांचीसोय कशी करण्यात येणार ? :- एन-८ सिडको परिसरात असलेल्या महानगरपालिका प्राथमिक शाळा, तसेच नव्यानेच सुरु झालेल्या तेरणा प्राथमिक शाळा, या शाळांमध्ये येथील विद्यार्थ्यांची सोय करण्यात येईल.

१०] मुळ ठिकाणच्या शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे स्थलांतरीत शाळेत समायोजन करण्यात येणार आहे किंवा कसे ? संस्थेने तसे हमीपत्र दिले आहे काय ? दिले असल्यास प्रत जोडावी ? :- मुळ ठिकाणच्या शाळेतील शिक्षक कर्मचा-यांचे स्थलांतरीत शाळेत समायोजन करण्यात येणार असुन संबंधीत शिक्षकांचे हमीपत्र व संस्थेचे हमी पत्र सोबत जोडलेले आहे.

११] सदर शाळा सध्या सुरु आहे काय ? :- होय
सिडको, एन-८ परिसरात सदर शाळा इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत सुरु आहे.

१२] सदरच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे स्थलांतरास सहमती आहे काय ? असल्यास त्याबाबतचे हमीपत्र दिलेले आहे काय ? :- होय,
सोबत शिक्षकांचे सहमती पत्र जोडलेले आहे.

१३] स्थलांतरीत परिसरातील ६ ते ११ वयोगटातील विद्यार्थी संख्या. :-

| | |
|---|---|
| ६ वर्षे - ६८ | १० वर्षे - ५१ |
| ७ वर्षे - ६५ | ११ वर्षे - ५० |
| ८ वर्षे - ६३ | |
| ९ वर्षे - ६१ | |

१४] सदर प्राथमिक शाळेच्या स्थलांतराबाबत आपले स्पष्ट अभिप्राय काय आहेत :-

कृपया राष्ट्रकूट प्रा. शा. एन. ८ सिडको औरंगाबाद येथून नाथवळी औरंगाबाद येथे स्थलांतराबाबत प्रस्ताव दाखल केलेला आहे. प्रस्तावाची छाननी केली असता स्थलांतराचे अंतर जवळच आहे. परंतु सिडको परिसरात मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये अतिक्रमण हटाव मोहीम सुरु झाल्यामुळे शाळेस जागा मिळणे कठिण आहे. याउलट नाथवळी हा परिसर म.न.पा. क्षेत्र असून या ठिकाणी संस्थेने ११ वर्षांचे लिजने जागा खरेदी करुन इमारत बांधलेली आहे. त्यामुळे मुलांना चांगल्या खोल्या व हवेशीर परिसर मिळणार आहे. त्याचप्रमाणे नाथवळी परिसरात दुसरी प्राथमिक शाळा नसल्यामुळे त्याचा इतर शाळावर परिणाम होणार नाही.
प्रस्तावित ठिकाणी संस्थेने भौतिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यामुळे स्थलांतरास स्पष्ट शिफारस आहे.

(सही)
(औ. एम. घोराडे)
जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी
जि. प. औरंगाबाद.

(सही)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद औरंगाबाद.

संस्थेने हमीपत्र दिलेले आहे.

६]स्थलांतरीत ठिकाणी शाळेच्या :- परिसरात इतर शासकिय व खाजगी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेची संख्या किती ? व त्यामधील विद्यार्थी संख्या.

स्थलांतरीत ठिकाण जाधववाडी, नविन वसाहत असल्यामुळे या परिसरातील लोकसंख्या २० ते २५ हजार पेक्षा जास्त असुन या भागात प्राथमिक प्राथमिक शाळेची कोणतीही व्यवस्था अद्याप उपलब्ध नाही व संस्थेने लिजने घेतलेल्या जागेवर भव्य वास्तु व सुविधा उपलब्ध करुन दिल्याने या परिसरातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

७]मुळ ठिकाणची व स्थलांतराच्या ठिकाणची :- विद्यार्थी संख्या.

| अ.क्र. | इयत्ता/वर्ग | मुळ ठिकाणची विद्यार्थीसंख्या | प्रस्तावीत ठिकाणची मिळणारी विद्यार्थीसंख्या |
|---|---|---|---|
| १] | वर्ग - १ ला | ४५ | ६८ |
| २] | वर्ग - २ रा | ४३ | ६५ |
| ३] | वर्ग - ३ रा | ४४ | ६३ |
| ४] | वर्ग - ४ था | ४३ | ६१ |
| ५] | वर्ग - ५ वी | ४० | ५१ |
| ६] | वर्ग - ६ वी | ४४ | ४८ |
| ७] | वर्ग - ७ वा | ४३ | ४५ |

८] सदरहू प्राथमिक शाळेस मान्यता दिल्यास त्याचा इतर मान्यता प्राप्त शाळेवर परिणाम होईल किंवा कसे ?

:- दिड की.मी.अंतरावर कोणत्याही प्रकारची प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे कोणत्याही शाळेवर स्थलांतरास मान्यता दिल्यास कुठलाही परिणाम होणार नाही. त्याचप्रमाणे ही नविन वसाहत असुन या भागात सतत विद्यार्थी संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन संस्थेस जुन २००२ पासुन स्थलांतरास मान्यता मिळणे आवश्यक आहे.